जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास
निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्रमांक :-आव्यप्र-२०१९/प्रक्र.७९/आव्यप्र-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०१.०४.२०१९

प्रस्तावना:-

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या तरतूदीनुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. आपत्तीप्रसंगी प्रतिसाद देणा-या यंत्रणांचे सक्षमीकरण करणे ही प्राधिकरणाची मुख्य जबाबदारी आहे. तसेच या अधिनियमाच्या कलम २२ व २४ (के)मध्ये राज्य कार्यकारी समितीच्या जबाबदा-या नमूद केल्या आहेत. या शिवाय केंद्रीय गृह मंत्रालयाच्या दिनांक ३० जुलै, २०१५ च्या ज्ञापनातील मुद्या क्र. १८.०१ मध्ये Capacity Building संदर्भात एसडीआरएफ निधीच्या ५ टक्के खर्चाबाबत तरतूदी नमूद केल्या आहेत.

आपत्ती व्यवस्थापनांतर्गत उचित प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच शोध मोहिम व बचाव कार्याशी संबंधीत साहित्य खरेदीसाठी राज्यातील ३६ जिल्हयांना निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम ३१ प्रमाणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करुन त्यानुषंगाने विविध घटकांच्या Capacity Building साठी तसेच आपत्ती व्यवस्थापनांतर्गत उचित प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि शोध मोहिम व बचाव कार्याशी संबंधीत साहित्य खरेदीसाठी राज्यातील ३६ जिल्हयांना प्रत्येकी रु.३०.०० लक्ष प्रमाणे एकूण रु.१०,८०,०००००/ (रुपये दहा कोटी ऐंशी लक्ष फक्त) एवढा निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

विभागीय आयुक्तांनी उपरोक्त निधी सोबतच्या प्रपत्राप्रमाणे त्यांच्या विभागातील जिल्ह्यांना वितरीत करावा.

जिल्ह्यांना वितरित करण्यात आलेला निधी आपत्ती व्यवस्थापनासाठी वितरीत करण्यात आला असल्याने त्याचा विनियोग जनजागृती / क्षमताबांधणी / आराखडे / प्रशिक्षण व कार्यशाळा संस्थात्मक मजबुतीकरण / शोध व बचाव साहित्य खरेदी / संरचनात्मक कामे यासाठी करण्यात यावा.

सदर जिल्हा आपत्ती सौमिकरणासाठी वितरित करण्यात आलेला निधी अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांना कोषागारातून काढून खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

जिल्हयांना प्राप्त तरतूदीतून खर्च करुन झालेल्या खर्चाचा मासिक खर्च अहवाल दरमहा १० तारखेपर्यंत वित्तीय सल्लागार व सह सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठवावा. खर्च करताना केंद्रशासनाचे ज्ञापन दिनांक ३० जूलै २०१५ चे उल्लंघन करु नये. सदर ज्ञापन www.ndmindia.nic.in वर उपलब्ध आहे.

याकामी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६ , २२४५-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ८०-सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (०१)महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (०१)(०१) महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे कार्यालय स्थापन करणे व फर्निचर व साधनसामुग्रीसह सुसज्जीकरण करणे (२२४५ १७६१) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४०११४३६००६४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIRANG SHRIPATI GHOLAP

Digitally signed by SHRIRANG SHRIPATI GHOLAP
DN: CN = SHRIRANG SHRIPATI GHOLAP, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST DEPT
Date: 2019.04.01 14:40:11 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी
३. महालेखाकार (महाराष्ट्र-१) मुंबई.
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. वित्तीय सल्लागार व सह सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
६. लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवड नस्ती.

प्रपत्र

शासन निर्णय क्रमांक :-आव्यप्र-२०१९/प्रक्र.७९/आव्यप्र-१ , दिनांक ०१.०४.२०१९ चे सहपत्र

अ.क्र.	जिल्हा	निधी
१.	मुंबई शहर	३०,००,०००/-
२.	मुंबई उपनगर	३०,००,०००/-
३	ठाणे	३०,००,०००/-
४	पालघर	३०,००,०००/-
५	रायगड	३०,००,०००/-
६	रत्नागिरी	३०,००,०००/-
७	सिंधुदुर्ग	३०,००,०००/-
	कोकण विभाग	**२,१०,००,०००/-**
८	पुणे	३०,००,०००/-
९	सातारा	३०,००,०००/-
१०	सांगली	३०,००,०००/-
११	सोलापूर	३०,००,०००/-
१२	कोल्हापूर	३०,००,०००/-
	पुणे विभाग	१,५०,००,०००/-
१३	नागपूर	३०,००,०००/-
१४	वर्धा	३०,००,०००/-
१५	भंडारा	३०,००,०००/-
१६	गोंदिया	३०,००,०००/-
१७	चंद्रपूर	३०,००,०००/-
१८	गडचिरोली	३०,००,०००/-
	नागपूर	**१,८०,००,०००/-**
१९	औरंगाबाद	३०,००,०००/-
२०	जालना	३०,००,०००/-
२१	परभणी	३०,००,०००/-
२२	हिंगोली	३०,००,०००/-
२३	बीड	३०,००,०००/-
२४	नांदेड	३०,००,०००/-
२५	उस्मानाबाद	३०,००,०००/-
२६	लातूर	३०,००,०००/-
	औरंगाबाद	**२,४०,००,०००/-**
२७	अमरावती	३०,००,०००/-
२८	बुलढाणा	३०,००,०००/-
२९	अकोला	३०,००,०००/-

३०	वाशिम	३०,००,०००/-
३१	यवतमाळ	३०,००,०००/-
	अमरावती विभाग	**१,५०,००,०००/-**
३२	नाशिक	३०,००,०००/-
३३	धुळे	३०,००,०००/-
३४	नंदूरबार	३०,००,०००/-
३५	जळगाव	३०,००,०००/-
३६	अहमदनगर	३०,००,०००/-
	नाशिक विभाग	**१,५०,००,०००/-**
	एकूण	**१०,८०,००,०००/-**

SHRIRANG SHRIPATI GHOLAP

Digitally signed by SHRIRANG SHRIPATI GHOLAP
DN: CN = SHRIRANG SHRIPATI GHOLAP, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST DEPT
Date: 2019.04.01 14:40:56 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन